# ‘पॅनिक डिसऑर्डर’साठी व्यायाम प्रभावी

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** ‘पॅनिक डिसऑर्डर’च्या (घाबरण्याचा विकार) उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक मानसोपचार पद्धतींपेक्षा अल्पकालीन पण सातत्यपूर्ण व्यायाम अधिक प्रभावी ठरू शकतो, असा निष्कर्ष एका नव्या अभ्यासातून समोर आला आहे. ब्राझीलमधील साओ पावलो विद्यापीठातील संशोधनानुसार, नियंत्रित आणि उच्च तीव्रतेच्या व्यायामामुळे ‘पॅनिक अटॅक’ची वारंवारता व तीव्रता लक्षणीयरीत्या कमी होते.

या विकारामध्ये प्रामुख्याने अचानक तीव्र घबराट, छातीत धडधड, घाम येणे, श्वास वेगाने होणे अशी लक्षणे आढळतात. यावर सध्या ‘कॉग्निटिव्ह बिहेविअरल थेरपी’सह विविध मानसोपचार पद्धती वापरल्या जातात. मात्र या अभ्यासात व्यायामालाच ‘इंटेरोसेप्टिव्ह एक्स्पोजर’ म्हणून वापरण्यात आले. त्यातूनच व्यायामाद्वारे शरीरात निर्माण होणाऱ्या संवेदनांमुळे रुग्णाला पॅनिक अटॅकसारख्या लक्षणांचा सामना सुरक्षितरीत्या करता येते हे सिद्ध झाले.

अभ्यासात पॅनिक डिसऑर्डरचे निदान झालेल्या १०२ महिला व पुरुषांचा समावेश होता. सहभागी व्यक्तींना दोन गटांत विभागून १२ आठवड्यांचा प्रयोग करण्यात आला. एका गटाने चालणे आणि अधूनमधून ३० सेकंदांचे तीव्र धावण्याचे सत्र केले, तर दुसऱ्या गटाने स्नायूंच्या हालचालींचे व्यायाम केले. दोन्ही गटांमध्ये सुधारणा दिसून आली, मात्र तीव्र व्यायाम करणाऱ्या गटात पॅनिक अटॅकची वारंवारता आणि तीव्रता अधिक प्रमाणात कमी झाल्याचे संशोधकांनी नमूद केले.

हा व्यायाम उपचार नैसर्गिक, कमी खर्चीक असून तो दैनंदिन आयुष्यात सहजपणे अवलंबता येऊ शकतो, असे संशोधकांचे मत आहे.




**तन्वीज्येष्ठा टॅबलेट्स संगीतकार श्रीधर फडके गीतगायन स्पर्धा**

सुप्रसिद्ध संगीतकार व गायक श्रीधर फडके यांनी संगीतबद्ध केलेले ऋतू हिरवा, फिटे अंधाराचे जाळे, मना घडवी संस्कार असे कोणतेही एक गाणे गाऊन, त्याचा 3 मिनिटांचा व्हिडीओ 15 मार्च पर्यंत 9820075813 या तन्वी ऑफिस नंबरवर आपले नाव, वय,फोन नंबर,पत्त्यासह पाठवा आणि ट्रॉफी जिंका ....

5 एप्रिलला कल्याणमध्ये सकाळी 10.30 ला अत्रे रंगमंदिरात सुस्वर क्रियेशन्स आणि अक्षरमंच प्रतिष्ठान प्रस्तुत " येथोनी आनंदू रे " या सांगीतिक कार्यक्रमात स्वत: श्रीधर फडके यांच्या हस्ते पहिली 3 बक्षीसे व ट्रॉफी दिली जाईल .



भाग घेणाऱ्या प्रत्येकाला पार्टीसिपेशन अवॉर्ड सर्टिफिकेट व्हाट्सअपवर पाठवण्यात येईल.

# पालकमंत्री राजवट संपुष्टात

## मुंबई महापालिकेतील कार्यालये आता समित्यांसाठी

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई महापालिकेत चार वर्षांनी पुन्हा नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे प्रशासकासह पालकमंत्र्यांचीही राजवट संपुष्टात आली आहे. परिणामी महानगरपालिका मुख्यालयाच्या जुन्या इमारतीतील पालकमंत्र्यांचे कार्यालय बंद झाले असून ते आता शिक्षण समितीच्या अध्यक्षांसाठी पुन्हा सज्ज होणार आहे.

मुंबई महापालिकेची मुदत मार्च २०२२ मध्ये संपल्यानंतरही माजी नगरसेवकांच्या मागणीनुसार काही काळ महापालिकेतील पक्ष कार्यालये सुरू ठेवण्यात आली होती. मात्र, जून २०२२ मध्ये फूट पडल्यानंतर शिवसेनेच्या दोन गटांत पक्ष कार्यालयाबाबत मोठा वाद निर्माण झाला. त्यामुळे, प्रशासनाने डिसेंबर २०२२ मध्ये मुख्यालयातील सर्व पक्ष कार्यालयांना टाळे ठोकले.

तत्कालीन पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या मागणीनुसार महापालिका मुख्यालयात त्यांचे कार्यालय सुरू झाले होते. जुन्या इमारतीत पहिल्या मजल्यावर शिक्षण समितीच्या कार्यालयात लोढा यांना हे कार्यालय दिले होते. त्यामुळे, भाजपच्या माजी नगरसेवकांना महापालिकेत हक्काचे कार्यालय मिळाले होते. मात्र इतर सर्व पक्षांची कार्यालये बंद होती. तर, शिवसेनेच्या कार्यालयात प्रशासनाने तात्पुरते निवडणूक कार्यालय सुरू केले होते. ही दोन्ही कार्यालये आता रिकामी केली असून पुन्हा पालकमंत्र्यांचे कार्यालय शिक्षण समिती अध्यक्षांसाठी उपलब्ध केले जाणार आहे.



### भाजपचा पक्ष कार्यालयावर ताबा

विधानसभा निवडणुकीनंतर पालकमंत्री बदलले. या वेळी पालकमंत्र्यांना पालिका मुख्यालयात कार्यालये देण्यात आली नव्हती. मात्र आधीच्या कार्यकाळात लोढा यांना दिलेले कार्यालय मात्र तसेच होते. त्यात भाजपच्या लोकप्रतिनिधींचा वावर आणि वापर अद्याप सुरू होता. आता पालिका निवडणूक झाल्यानंतर भाजपने सर्वात आधी पक्ष कार्यालय ताब्यात घेतले असून, पालकमंत्र्यांचे कार्यालय पुन्हा एकदा शिक्षण समितीला देण्यात येणार आहे.

### सरकारचा पालिकेत थेट अंमल

- महापालिकेतील पक्ष कार्यालये बंद केल्यानंतर २०२३ मध्ये उपनगरचे तत्कालीन पालकमंत्री लोढा यांनी मुख्यालयात कार्यालय देण्याची मागणी केली होती. त्यानंतर लगेचच त्यावेळचे शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनीही कार्यालयाची मागणी केली होती.
- दोन्ही कार्यालयांमध्ये पालकमंत्री येऊन बसत व महापालिका अधिकाऱ्यांच्या बैठका घेत. केसरकर आणि लोढा यांना महापालिका मुख्यालयात कार्यालय दिल्यामुळे राज्य सरकारचा थेट अंमल पालिकेच्या कारभारात सुरू झाला व एक नवीन प्रथाही सुरू झाली.

# सिद्दिकी हत्या प्रकरणातील एका आरोपीला जामीन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी आकाशदीप करज सिंग (२२) याला उच्च न्यायालयाने सोमवारी जामीन मंजूर केला. या प्रकरणात जामीन मिळालेला आकाशदीप हा पहिला आरोपी आहे.

गुंड लॉरेन्स आणि अनमोल बिश्नोई यांच्या नेतृत्वाखालील संघटित गुन्हेगारी टोळीने केलेला हा गुन्हा निःसंशयपणे गंभीर स्वरूपाचा आहे. तथापि, आकाशदीप याच्या संदर्भातील सरकारी पक्षाने सादर केलेले पुरावे तपासल्यानंतर, या टप्प्यावर त्याचे टोळीशी संबंध असल्याचे किंवा त्याने गुन्हा केल्याचे आरोप सकृतदर्शनी खरे असल्याचे दिसून येत नाही, असे निरीक्षण न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या एकलपीठाने नोंदवले.

पंजाबचा रहिवासी असलेल्या आकाशदीप याला न्यायालयाने एक लाख रुपयांच्या हमीच्या अटीवर जामीन मंजूर केला. तसेच, मुंबई सोडून न जाण्याचे आणि दर दुसऱ्या सोमवारी संबंधित पोलीस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

# आजपासून बारावीची परीक्षा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेण्यात येणारी बारावीची परीक्षा मंगळवारपासून (१० फेब्रुवारी) राज्यभरात सुरू होत आहे. परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी २७१ भरारी पथकांसह अन्य उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

परीक्षेसाठी १०,६६४ शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांतील १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा विद्यार्थीसंख्या सुमारे २७ हजारांनी वाढली आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी पत्रकार परिषदेत यासंदर्भात माहिती दिली.

पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत परीक्षा घेतली जाणार आहे. गेल्या वर्षी १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यंदा नोदणी केलेल्या १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांमध्ये ८ लाख २० हजार २२९ मुले, ७ लाख १२ हजार २४० मुली, तर १८ तृतीयपंथी विद्यार्थी आहेत. माहिती-तंत्रज्ञान, सामान्य ज्ञान या विषयांची परीक्षा ऑनलाइन घेतली जाणार आहे. एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी ३ फेब्रुवारीपर्यंत अर्ज स्वीकारण्यात आले. विद्यार्थ्यांनी राज्य मंडळामार्फत प्रसिद्ध आणि छपाई केलेलेच वेळापत्रक ग्राह्य धरावे, असे डॉ. बेडसे यांनी सांगितले.

**शाखानिहाय विद्यार्थी**



- कला : ३,८०,६९२
- वाणिज्य : ३,२०,१५२
- विज्ञान : ७,९९,७७३
- व्यावसायिक अभ्यासक्रम : २७,३७८
- आयटीआय : ४,४९२

**विद्यार्थी संख्या**

पुणे : २,६०,०१४
नागपूर : १,६०,५३०
छत्रपती संभाजीनगर : १,९१,४९३
मुंबई : ३,५२,७७८
कोल्हापूर : १,१६,६११
अमरावती : १,५६,९१५
नाशिक : १,७३,६५१
लातूर : ९६,५४२
कोकण : २४,०१३

# बारावीची १७२ परीक्षा केंद्रे ‘सीसीटीव्ही’विना

**पुणे :** राज्यात दहावी, बारावीच्या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार ९० टक्क्यांपेक्षा अधिक केंद्रांवर ही यंत्रणा उपलब्ध आहे. मात्र, १७२ परीक्षा केंद्रांवर ही सुविधा नसल्याने तेथील कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यात आली आहे. यात ही यंत्रणा नसलेली सर्वाधिक केंद्रे अमरावती विभागात आहेत.

राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी या वेळी उपस्थित होते. परीक्षेच्या कामकाजावर देखरेख करण्यासाठी राज्यस्तरीय दक्षता समितीची नेमणूक करण्यात आली असून राज्यात ३ हजार ३८७ मुख्य केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार आहे.

# राज्यात ७० हजार पदांची लवकरच नोकरभरती

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात नव्या पद्धतीने लवकरच नोकरभरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून सुमारे ७० हजाराहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे ५० हजार आणि आयोगाच्या कक्षेबाहेरील २० हजार पदांचा समावेश आहे. भरती प्रक्रियेत आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी दिले.

फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृहात बैठक पार पडली. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव उपस्थित होते. प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांमध्ये सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबविण्यात याव्यात. मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता याला प्राधान्य असेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणांबाबत सह्याद्री अतिथीगृहात बैठक पार पडली.

### डिजिटल पडताळणीवर भर

भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाइन व डिजिटल पडताळणी प्रारुप विकसित करण्यावर भर देण्याच्या सूचना फडणवीस यांनी केल्या. पारपत्रासारख्या दस्तऐवजांची ऑनलाइन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे प्रारुप वापरता येईल. यासाठी ब्लॉकचेन पद्धतीबरोबरच डीजीलॉकर प्रणालीत प्रमाणपत्रे उपलब्ध करावी, असे फडणवीस यांनी सांगितले.

**Reliance**
**Industries Limited**
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सेबीचे परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/एमआयआरएसडी/डीओसी३/सीआयआर/पी/२०१८/१३९ दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ नुसार, कंपनीपाशी हस्तांतरण करून घेणार/दावा करणार यांचेकडून खालील तपशिलानुसार भागधारका(कां)चे नावे असलेले खाली नमूद करण्यात आलेले समभाग, त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी विनंती प्राप्त झाली आहे:

| अनु. क्र. | दावा करणार/प्रस्तावित हस्तांतरण करून घेणार यांचे नाव व पत्ता | फोलिओ क्रमांक | नोंदणीकृत भागधारका(कां)चे नाव व पत्ता | प्रमाणपत्र क्रमांक | इक्विटी समभाग संख्या | विशिष्ट क्रमांक पासून | विशिष्ट क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजेंद्रसिंह मोहनसिंग अरोरा<br>मनदीपकौर<br>ए–७०४, वसंत विहार कॉम्प्लेक्स, डॉ. सी. गिडवाणी मार्ग, चेंबूर, मुंबई, महाराष्ट्र ४०००७४ | १०८८४३०१५ | शरणजीत सिंग<br>प्रित कौर,<br>ए–७०४, वसंत विहार, डॉ. सी. जी. रोड, चेंबूर, मुंबई ४०००७४. | ६७०१८८२५ | १८ | ६९०६९१९३४२ | ६९०६९१९३५९ |
| २ | हितेशभाई आय्. पटेल<br>लुवरा पी. ओ., लखीगाव, ता. वगरा, जिल्हा भरुच, गुजरात ३९२१३० | ०८८३८५५२७ | ईश्वरभाई भागा<br>लुवरा पी. ओ., लखीगाव, ता. वगरा, जिल्हा भरुच, गुजरात ३९२१३० | ५९२४४०८१<br>६२३६४७०३ | ३३<br>३३ | १९३०६८१७२६<br>२१९७५४२७७७ | १९३०६८१७५८<br>२१९७५४२८०९ |
| ३ | संदीप शर्मा<br>घर क्रमांक ११४, सेक्टर ८, फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | ०६८१०८८५३ | रवीदत्त शर्मा,<br>घर क्रमांक–११४, सेक्टर ८, फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | १६०११७४८ | २५ | ४०००१३८७० | ४०००१३८९४ |
| ४ | संदीप शर्मा<br>घर क्रमांक ११४, सेक्टर ८, फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | ०७३१४२३४२ | रवी दत्त शर्मा<br>घर क्रमांक–११४, सेक्टर ८, फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | १६१३३९१२<br>१६१३३९१३ | २५<br>५ | ४०३१५८७४५<br>४०३१५८७७० | ४०३१५८७६९<br>४०३१५८७७४ |
| ५ | संदीप शर्मा<br>घर क्रमांक ११४, सेक्टर ८ फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | ०८८२९७०६७ | रवी दत्त शर्मा<br>घर क्रमांक–११४, सेक्टर ८ फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | ५९२३४१६८<br>६२२४७११५ | २८<br>२८ | १९३०४२३५४३<br>२१८८५४००११ | १९३०४२३५७०<br>२१८८५४००३८ |
| ६ | संदीप शर्मा<br>घर क्रमांक ११४, सेक्टर ८ फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | ०६८१०८८५३ | रवी दत्त शर्मा<br>घर क्रमांक–११४, सेक्टर ८ फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | ६२२४७३९५ | २५ | २१८८५५९४२० | २१८८५५९४४४ |
| ७ | संदीप शर्मा<br>घर क्रमांक ११४, सेक्टर ८ फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | ०७३१४२३४२ | रवीदत्त शर्मा<br>घर क्रमांक–११४, सेक्टर ८ फरिदाबाद, हरियाणा १२१००६ | ६२२४७०८३ | ३० | २१८८५३७१६८ | २१८८५३७१९७ |
| ८ | राजेंद्रसिंह मोहनसिंग अरोरा<br>मनदीपकौर<br>ए–७०४, वसंत विहार कॉम्प्लेक्स, सी गिडवाणी मार्ग, चेंबूर, मुंबई, महाराष्ट्र ४०००७४ | १०८८३८६४० | प्रीतम कौर<br>रूम प्रीत कौर<br>ए–७०४, वसंत विहार कॉम्प्लेक्स, क्युबिक मॉलच्या शेजारी, डॉ. सी. जी. रोड, चेंबूर, मुंबई, महाराष्ट्र ४०००७४ | ५९६३३१११ | ९ | १६१५५९७६३३ | १६१५५९७६४१ |
| ९ | मदन लाल आंग्रा<br>नरेश कुमार आंग्रा<br>घर क्र. ३६०५, सेक्टर ३५ डी, चंदीगड १६००२२ | ०४८३४८५४८ | कमला देवी<br>बिशन दास मेहता<br>घर क्र. ३६०५, सेक्टर ३५ डी, चंदीगड १६००२२ | १०७३९३१८<br>५०८४००७४<br>६२२६०६८८ | २०<br>२०<br>४० | १९२२६५८९०<br>११६३७५४८८४<br>२१८९५१५७७२ | १९२२६५९०९<br>११६३७५४९०३<br>२१८९५१५८११ |
| १० | सत्येंद्र कुमार जैन<br>ए– ११३, गंगासागर कॉलनी, गंगा नगर, मावना रोड, मेरठ, उत्तर प्रदेश २५०००१ | ०६०१२८६०० | निधी जैन<br>ए– ११३, गंगासागर कॉलनी, गंगा नगर, मावना रोड, मेरठ, उत्तर प्रदेश २५०००१ | १२३६९९०८<br>५०६४६७९०<br>६१८९५२८५ | ९<br>९<br>१८ | २५५७७७४६७<br>११६१२६८९४३<br>२१८११४११८४ | २५५७७७४७५<br>११६१२६८९५१<br>२१८११४१२०१ |
| ११ | सत्येंद्र कुमार जैन<br>ए– ११३, गंगासागर कॉलनी, गंगा नगर, मावना रोड, मेरठ, उत्तर प्रदेश २५०००१ | ०६१०४९८८६ | निधी जैन<br>ए– ११३, गंगासागर कॉलनी, गंगा नगर, मावना रोड, मेरठ, उत्तर प्रदेश २५०००१ | १४०६२३१५<br>५०४०७७३१<br>६१८९५२८६ | १<br>१<br>२ | ३३०९९८०३१<br>११६०३५८५५४<br>२१८११४१२०२ | ३३०९९८०३१<br>११६०३५८५५४<br>२१८११४१२०३ |

संबंधित हस्तांतरण करून घेणार/दावा करणार यांनी संबंधित समभाग खरेदी/संपादित केल्याचा आणि ते यापूर्वी हस्तांतरणासाठी सादर करण्यात आल्याचा आणि/किंवा कंपनीकडून आक्षेपासह परत पाठविले गेले होते.

कोणत्याही व्यक्तीला/व्यक्तींना या संदर्भात काही आक्षेप असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस (३०) दिवसांच्या आत कंपनीचे रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण एजंट म्हणजेच **''केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड''**, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१–३२, गचीबॉवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद – ५०० ०३२ यांच्याकडे आपला आक्षेप नोंदवावा, अन्यथा कंपनी उपरोक्त समभाग हस्तांतरित करण्याची कार्यवाही पूर्ण करेल.

स्थळ : मुंबई
दिनांक : १०.०२.२०२६

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
स्वाक्षरी/-
**सावित्री पारेख**
**कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर**

www.ril.com

From The Promoter's of P. N. GADGIL & SONS 1832 Gold | Silver | Diamonds

Gargi by P. N. Gadgil & Sons

## PNGS GARGI FASHION JEWELLERY LIMITED

CIN: - L36100PN2009PLC133691
Registered Office : Plot No.8A ,Sr No.37/1 and 37/2, Opposite Maruti Service Centre, Sinhgad Road, Wadgaon Khurd, Nanded, Pune, Haveli, Maharashtra, India, 411041
Website : www.gargibypng.com Email-Id: investor@gargibypng.com
India +91 020 2991 1980 / 81 / 82 Fax 020 2991 1982

Statement of Unaudited Financial Results for the quarter and nine months ended 31st December, 2025 pursuant to Regulation 33 of SEBI (LODR) Regulations, 2015
(BSE SME Segment Scrip Code : GARGI - 543709)

(Rupees in Lakhs except EPS)

| Particulars | Three months ended | | | Nine months ended | | Year ended |
|---|---|---|---|---|---|---|
| | Dec 31, 2025 | Sep 30, 2025 | Dec 31, 2024 | Dec 31, 2025 | Dec 31, 2024 | Mar 31, 2025 |
| | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| Revenue From Operations | 4605.55 | 4,644.82 | 3624.38 | 11981.47 | 10363.48 | 12634.80 |
| Profit before exceptional item and tax | 1433.52 | 1,374.16 | 1226.22 | 3521.54 | 3319.80 | 3870.23 |
| Exceptional Item | 15.18 | - | - | 15.18 | - | - |
| Profit after exceptional item and tax | 1060.17 | 1027.48 | 914.59 | 2618.98 | 2469.74 | 2880.68 |
| Total Comprehensive Income (Comprising Of Profit After Tax & Other Comprehensive Income After Tax)/ | 1059.87 | 1027.01 | 914.58 | 2617.75 | 2469.73 | 2878.81 |
| Earnings Per Equity Share : | | | | | | |
| 1)Basic (in ₹) - Not Annualized | 10.13 | 9.88 | 8.83 | 25.16 | 24.78 | 28.62 |
| 2)Diluted (in ₹) - Not Annualized | 10.13 | 9.88 | 8.83 | 25.16 | 24.78 | 28.62 |
| Paid Up Equity Share Capital | 1,047.03 | 1,047.03 | 1,035.78 | 1,047.03 | 1,035.78 | 1,035.78 |
| Other Equity | | | | | | 8,932.83 |
| Total No. of Share (Weighted Average) | 1,04,70,303 | 1,04,01,825 | 1,03,57,803 | 1,04,10,167 | 99,67,692 | 1,00,63,884 |
| Face value of per share (in ₹) | 10.00 | 10.00 | 10.00 | 10.00 | 10.00 | 10.00 |

Notes:
1) The above is an extract of the detailed format of the Unaudited Standalone financial results for the quarter and nine month ended December 31, 2025 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.
The explantory note to results provides the exact effect of change in business model of the company. The said note and the full format of the Unaudited financial results for the quarter and nine months ended December 31, 2025 is available on the Stock Exchange websites (www.bseindia.com) and on the Company's website (www.gargibypng.com) or can be accessed by scanning QR code.
2) The above results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their respective meetings held on February 09, 2026.

Place: Pune
Date : February 09, 2026

For and on behalf of the Board of Directors of
PNGS Gargi Fashion Jewellery Limited
Sd/-
Govind Gadgil - Chairman & Director
DIN: 00616617